**ग्रामपंचायती / जिल्हा परिषदांनी हस्तातरीत करुन न घेतलेल्या पाणी योजनावरील देखभाल व दुरुस्तीपोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देय असलेली थकबाकी वसुल करणे.**

**शासनाकडून जिल्हा परिषदांना देय अनुदानातून**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र: ग्रापापु-१०९८/प्र.क्र.१७६/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २४/८/१९९८.**

**प्रस्तावना :-**

शासनाने केलेल्या संकल्पानुसार राज्यातील सर्व जनतेस सन १९९९-२००० सालापर्यत नळाद्वारे सदोदीत व पुरेसे स्वच्छ पाणी पुरवावयाचे आहे त्याकरिता शासन अनेक विविध मार्गाने निधीची उभारणी करुन शतप्रतिशत शासकीय अनुदानातून योजना राबवित आहे.

२. तयार करण्यात आलेल्या नळपाणी योजना हया यशस्वी चाचणीनंतर आणि शासनाच्या धोरणानुसार स्वतंत्र योजना असतील तर ग्रामपंचायती आणि प्रादेशिक असतील तर जिल्हा परिषदांनी पुढील देखभाल व व्यवस्थापनाकरिता हस्तातरीत करुन घेऊन स्थानिक जनतेला पाणी पुरविण्याची वैधानिक जबाबदारी पार पाडावयाची आहे. परंतु राज्यामध्ये काही जिल्हापरिषदाकडून काही प्रादेशिक तव्दत स्वतंत्र नळयोजना हया हस्तांतरीत करुन घेतल्या जात नाही असा नेहमीचा अनुभव आहे. परिणामी अशा हस्तातरीत योजना हया जनतेची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून अपरिहार्यपणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास त्या चालू ठेवाव्या लागतात. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला करोडो रुपये खर्च करावा लागतो देखभाल दुरुस्तीकरीता होणाऱ्या खर्चाची रक्कम / थकबाकी देखील स्थानिक स्वराज्य संस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करित नाहीत अशी थकबाकी दिवसेदिवस वाढतच चालली आहे. वा त्यासाठी शासनाकडून देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कोणतेही अनुदान दिले जात नाही. योजनाअंतर्गत तरतुदी, हया देखभाल व दुरुस्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून खर्च झाल्यामुळे त्याचा विपरित परिणाम हा नविन योजना राबविण्यावर होऊन योजनेची अंमलबजावणी होण्यावर होतो. यास्तव अशा अहस्तांतरीत योजनांच्या देखभाल व दुरुस्ती करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला आर्थीक स्त्रोत उपलब्ध करुन देण्याची बाब काही काळ शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** वर विषद केलेल्या पार्श्वभुमीवर राज्यातील ज्या जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती नळ पाणी योजना हस्तांतरीत करुन घेत नाहीत. अशा जिल्हा परिषदांना शासनाकडून राज्यस्तरीय योजनांतर्गत तरतुदीच्या आणि केंद्र शासन पुरस्कृत वर्धितवेध कार्यक्रमांतर्गत दरवर्षीच्या योजनांतर्गत तरतुदीच्या देय असणाऱ्या

एकुण १०% अनुदानापैकी देय ठरणाऱ्या अनुदानातून २०% इतकी रक्कम वळती करुन ती शासन स्तरावरुन थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अदा करण्यास शासन या आदेशान्वये मान्यता देत आहे.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अशा अहस्तांतरीत योजनांचा संख्यात्मक जिल्हा निहाय तपशील हा त्या त्या जिल्हा परिषदांकडुन थकबाकीसह ऑक्टोबर अखेर येणे असलेल्या रकमांची तपशील पुढील वर्षाच्या जानेवारी महिन्यामध्ये शासनास सादर करील. मात्र ३०.६.९८ रोजी येणे असलेल्या रकमेचा तपशील ३१.८.९८ पर्यंत शासनास सादर करतील.

मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची अशी थकबाकी ही प्रमाणशीर असुन त्या त्या जिल्हयातील अहस्तांतरीय योजनावरीलच आहे. असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संबंधित जिल्हापरिषदेच्या नियंत्रक वित्त व लेखा यांच्याकडुन प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे.

३. देखभाल व दुरुस्ती करिता विभागाअंतर्गत कार्यासना (पाणी पुरवठा-८) मार्फत जिल्हापरिषदांना जे एकुण १०% अनुदान देय आहे. त्या अनुदानातुन वर परिच्छेद १ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे आणि परिच्छेद २ मध्ये सादर झालेल्या तपशीलच्या आधारे त्या त्या विशिष्ट जिल्हयाची थकबाकी वळती करुन ती रोखस्वरुपात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नेहमीच्या प्रथेप्रमाणे अदा केली जाईल.

४. हया वजावटीच्या परिणामी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत त्या त्या जिल्हयाकरीता योजना राबविण्यासाठी ज्या योजनाअंतर्गत तरतुदी मंजुर केल्या जातात त्या तरतुदी आणि त्या पोटी जि. प. ना देखभाल व दुरुस्तीकरीता १०% प्रमाणे देय असणाऱ्या अनुदानामध्ये कोणत्याही प्रकारची अतिरिक्त वाढ केली जाणार नाही. याची देखील सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सु. ल. तिडके)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे मुख्य सचिव मंत्रालय.
२. मा. राज्यमंत्री यांचे आणि मुख्य सचिव मंत्रालय.
३. मा. अपर मुख्य सचिव, (पा.पु. व स्व. वि) यांचे स्विय सहाय्यक मंत्रालय.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
६. सदस्य सचिव, (प्रशासन अर्थ ) तांत्रिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई.
७. सर्व अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी.
८. सर्व विभागीय मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
९. मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव मंत्रालय.
10. सह सचिव, विशष कार्य अधिकारी ,व उप सचिव व कार्यासन अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.